संदर्भ क्रमांक: अंदाज /
दिनांक - 22 JUN 2017

# परिपत्रक क्र. दि.

**विषय: - मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३४ अन्वये लेखा विवरणपत्रे (हिशोबपत्रके) ऑनलाईन सादर करण्याबाबत.**

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३४ अन्वये लेखा विवरणपत्रे (हिशोबपत्रके) सर्व न्यासांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे दरवर्षी विहित वेळेत सादर करणे क्रमप्राप्त आहे. या अनुषंगाने धर्मादाय संघटनेमध्ये नविन संगणक प्रणाली विकसित केलेली असून ती सुरु करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीवरुन न्यासांना लेखा विवरणपत्रे (हिशोबपत्रके) ऑनलाईन सादर करण्याबाबत सुविधा उपलब्ध देण्यात आलेली आहे. तसेच याबाबत मार्गदर्शनासाठी सदर संगणक प्रणालीवर **"प्रणाली मार्गदर्शक"** या टॅब खाली अधिक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या प्रणालीचा सर्वांगीण वापर होण्यासाठी न्यासांचा सहभाग आवश्यक आहे. यामुळे विश्वस्त, सनदी लेखापाल ,लेखापरिक्षक यांचा वेळ वाचून धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे कामकाज अधिक परिणामकारक होऊ शकेल.

वरील बाब ध्यानी घेता, न्यासांनी त्यांची हिशोबपत्रके दाखल करताना **ऑनलाईन** पध्दतीने सादर करणे **बंधनकारक** करण्यात येत आहे. दस्तांचे स्वरुपातील हिशोबपत्रके यापुढे स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

या अनुषंगाने सर्व धर्मादाय सह आयुक्त/धर्मादाय उप आयुक्त/ सहायक धर्मादाय आयुक्त यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त न्यासांना याबाबत अवगत करावे. तसेच न्यासांनी ऑनलाईन हिशोबपत्रके दाखल केल्यानंतर त्यांना **User ID** तात्काळ मिळेल, अशी दक्षता घेण्या त यावी.

( श. भा. सावळे )
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रति,
धर्मादाय सह / उप आयुक्त,
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
**बृहन्मुंबई**/ठाणे रायगड/ **नाशिक/**
**पूणे/ कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/लातुर/नागपुर**